अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : ११४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ ।

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर महापालिका निवडणुकीमधील ऐतिहासिक विजयानंतर प्रचंड आत्मविश्वास वाढलेल्या भाजपनं जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये स्व:बळावर लढण्यसाठी दंड थोपटत तशी यंत्रणा कामाला लावली आहे. करमाळा तालुक्यात अजित पवार राष्ट्रवादीसोबत तर सांगोला तालुक्यात शिंदेसेनेसोबत युती करुन इथल्या निवडणूका लढण्याचं या पक्षानं निश्चित केलं आहे. आज बुधवारी दुपारी अडीच वाजेपर्यंत भाजपच्या या निवडणूक रणनितीचं अंतिम चित्र स्पष्ट होईल, असं पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनं मंगळवारी रात्री उशीरा खात्रीलायकरित्या दैनिक 'सुराज्य'ला सांगितलं.

सोलापुरातील नऊ तालुक्यात ऑपरेशन लोटस!

युतीचं जुगाड जुळवताना 'फिप्टी-फिप्टी'चा राबणार फॉर्म्युला

सांगोला आणि करमाळा तालुक्यात भाजप युती करुन निवडणुका लढवणार आहे. या दोन्ही तालुक्यात जिल्हा परिषदेच्या अनुक्रमे ७ आणि सहा तर पंचायत समित्यांच्या २६ जागा आहेत. जिल्हा परिषदेच्या जागांची संख्या विषम म्हणजे सात आहे. त्यापैकी मोठा भाऊ आणि लहान भाऊ असं समीकरण ठरलं तर भाजप ४ आणि शिंदेसेना ३ तर करमाळ्यात भाजप आणि माजी आमदार संजयमामा शिंदे प्रत्येक ३ याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या जागा सुटू शकतात. पंचायत समित्याच्या निम्या निम्या म्हटलं तर 'हम साथ साथ'च्या युतीच्या नाऱ्यातून प्रत्येक ६-६ याप्रमाणे जागा वाटपाचं सुत्र राहु शकतं.

सोलापूर जिल्ह्यातील भाजपचे पाच आमदार आणि धडाकेबाज पालकमंत्री त्याशिवाय अत्यंत महत्त्वाचं म्हणजे मुख्यमंत्री यांच्याकडून या जिल्ह्याच्या विकासात देण्यात येत असलेलं भरीव योगदान आणि भाजपनं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर जिल्ह्यात राबवलेलं यशस्वी लोटस 'ऑपरेशन' या सगळ्याच्या उमटलेल्या प्रभावातून सोलापूर जिल्ह्यात दोन ठिकाणच्या युतीचा अपवाद वगळता तब्बल ९ तालुक्यांमध्ये भाजप स्व:बळावर निवडणुका लढवत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण व उत्तर सोलापूर. अक्कलकोट, मोहोळ, माळशिरस, बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा आणि माढा या तालुक्यातील जिल्हा परिषदेसह पंचायत समित्यांच्या सर्व जागा भाजप स्व:बळावर लढणार आहे. करमाळा तालुक्यात माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटासोबत भाजपनं युती केली आहे. भाजपच्या नेत्या रश्मी बागल-कोलते यांच्यावर निवडणुकांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. युतीच्या माध्यमातून करमाळ्यात कोणी किती जागा लढणार? हे आज समजेल.

तसेच सांगोला तालुक्यात भाजपनं रणनितीच्या वेगळ्या सोंगट्या टाकल्या आहेत. इथं स्व:बळावर न लढता शिंदेसेनेला आपल्यासोबत येतलं आहे. भाजप आणि शिंदेसेनेमधील युतीच्या झेंड्याखाली इथल्या निवडणुका लढल्या जातील,असं ठरवण्यात आलं आहे.

भाजप झेडपी ५५ अन् पं.स.च्या ११० जागा लढणार स्व:बळावर

जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे एकूण ६८ गट तर पंचायत समित्यांचे १३६ गण आहेत. करमाळा आणि सांगोला या दोन तालुक्यात भाजप युती करुन लढत आहे. या दोन्ही तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १३ आणि पंचायत समित्यांच्या २६ जागा वगळता भाजप उर्वरित जिल्हा परिषदेच्या ५५ तर पंचायत समित्यांच्या ११० जागांवर आपल्या पक्षाचे उमेदवार देणार आहे.

'३५'चा मॅजिक फिगर गाठण्याचा भाजपला 'शत-प्रतिशत' विश्वास !

35

सोलापूर जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करण्यासाठी ३५ जागेचा मॅजिक फिगर गाठणं महत्वाचं आहे. दोन्ही राष्ट्रवादीनं याची तयारी केली आहे. त्या तुलनेत या आकड्यापेक्षा जादा जागा ताब्यात घेऊन इथल्या जिल्हा परिषदेवर निर्निवाद वर्चस्व प्रस्थापित करण्याची रणनिती भाजपनं अवलंबली आहे. त्यासाठी सोलापूर महापालिकेप्रमाणे साम, दाम, दंड आणि भेद याचा वापर करण्याची तयारी ठेवली आहे.

संजयमामा आणि रश्मीदीदी कोणते गट कोणाकडे घेणार?

करमाळा तालुक्यात पांडे (सर्वसाधारण महिला), वीट (सर्वसाधारण महिला), कोर्टी (सर्वसाधारण महिला), चिखलठाण (सर्वसाधारण), वांगी नंबर १ (सर्वसाधारण महिला), आणि केम (ओबीसी महिला) असे जिल्हा परिषदेचे महिलांसाठी आरक्षित झालेले गट आहेत. यापैकी कोणते गट माजी आमदार संजयमामा शिंदे आणि भाजप नेत्या रश्मी बागल-कोलते या घेणार याकडं सर्वांचं लक्ष आहे. आज दुपारपर्यंत याचं चित्र स्पष्ट होऊ शकतं.

शहाजीबापू कोणते घेणार गट? भाजप कोणत्या गटातून लढणार?

महुद बुद्रुक (ओबीसी), एखतपूर (ओबीसी महिला), जवळा(सर्वसाधारण), कडलास (सर्वसाधारण महिला), चोपडी (सर्वसाधारण), कोळा (सर्वसाधारण) आणि घेरडी(ओबीसी महिला) याप्रमाणे सांगोला तालुक्यात जिल्हा परिषेदेचे ७ गट आहेत. भाजप आपल्याकडे कोणते गट लढण्यासाठी घेणार, युतीमधील मित्र पक्ष शिंदेसेनेला कोणते गट सोडले जाणार? यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे. तो निर्णय आज दुपारी अडीच वाजेपर्यंत कळणार आहे.

युतीचं घोडं दामटलं; दोन्ही पक्ष लढणार आपापल्या चिन्हावर

शिवसेना

सांगोला आणि करमाळ्यात भाजप युती करुन लढणार आहे. मात्र युती करुन लढताना सांगोल्यात मिळालेल्या जागेवर भाजप 'कमळा'वर तर शिंदेसेना 'धनुष्यबाणा'वर लढेल तर करमाळा तालुक्यात संजयमामा शिंदे हे अजित पवार राष्ट्रवादीच्या 'घड्याळ' चिन्हावर उमेदवारांना लढायला लावतील. तर रश्मी बागल कोलते गटाचे उमेदवार 'कमळ' चिन्हावर लढतील.

इथे पण... तिथे पण... पलीकडेपण!

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील राजकारणा कायम चर्चेत असणारे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापुरे यांनी मंगळवारी हत्तूर पंचायत समितीसाठी अर्ज भरल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार ते बुधवारी वळसंग जिल्हा परिषद गटातूनही उमेदवारी अर्ज भरणार आहेत, आणि औराद पंचायत समितीसाठीही अर्ज दखल करणार आहेत. त्यामुळे हसापुरे नेमके जिल्हा परिषदेत जाणार की पंचायत समितीत? भाजपकडून लढणार की बंडखोर? याबाबत दक्षिण व उत्तर तालुक्यात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

भाजप महापालिकेसारखी खेळी करणार

दक्षिणमध्ये कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी निश्चित नसल्यामुळे एका जागेसाठी पाच पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. मंगळवारी २० जानेवारी रोजी एकूण ६९ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीची रंगत वाढल्याचे दिसून येत आहे. भाजपाने महापालिकेसारखी खेळी केली असून सर्वच इच्छुकांना उमेदवारी दाखल करण्यास सांगितले आहे. इच्छुकांमध्ये नाराजी निर्माण होऊ नये, यासाठी एबी फॉर्म शेवटच्या क्षणाला देणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे धाकधूक वाढली आहे.

जि. प. गटांसाठी २३ अर्ज

दक्षिण सोलापूर तालुक अर्ज भरण्यासाठी मंगळवारी इच्छुकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुकांची धावपळ सुरू आहे. त्यामुळे भाजपासह इतर पक्षांनी एबी फॉर्म वेटींगवर ठेवला आहे. मंगळवारी बोरामणी गटासाठी ४, कुंभारी गटासाठी ८, वळसंग गटासाठी १ , हत्तूर गटासाठी ३, मंद्रूप गटासाठी ४ व भंडारकवठे गटासाठी ३ असे एकूण २३ अर्ज दाखल झाले.

गणासाठी ४६ अर्ज

पंचायत समिती गण: कासेगाव गणातून १ , बोरामणी गणातून ४, कुंभारी गणातून ८, धोत्री गणातून १ , वळसंग गणातून ४, होटगी गणातून ४ , हत्तूर गणातून ७, औराद गणातून ३, मंद्रूप गणातून ४, कंदलगाव गणातून ३, भंडारकवठे गणातून १ व निंबर्गी गणातून ६असे एकूण ४६ अर्ज प्राप्त झाले आहेत.

सुरेश हसापुरे यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासोबत जात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढवून दणदणीत विजय मिळवला होता. त्या दिवसापासून ते भाजपच्या अधिक जवळ गेले आहेत. मध्यंतरी त्यांचा भाजप प्रवेशी होणार होता. मात्र महापालिका निवडणुका लागल्यामुळे तो प्रवेश लांबणीवर पडला. जिल्हा परिषद आरक्षण जाहीर झाल्यानंतर वळसंग गट हसापुरेंसाठी सेफ झोन मानला जात होता आणि त्यांनी याच गटातून तयारी सुरू केली होती. मात्र आता याच वळसंग गटातून दक्षिणचे माजी सभापती रामप्पा चिवडशेट्टी इच्छुक आहेत. त्यामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यापुढे चिवडशेट्टी की हसापुरे असा पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर हसापुरे यांनी अचानक हत्तूर पंचायत समितीसाठी अर्ज दाखल केल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे.

दक्षिण तालुक्यात पंचायत समिती सभापतीपद खुल्या वर्गासाठी राखीव असल्याने, सभापती होण्याच्या उद्देशानेच हसापुरे यांनी पंचायत समितीची चाचपणी सुरू केली का, हसापुरे यातून आणखी काही गेम खेळणार, अशीही चर्चा रंगली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार हसापुरे बुधवारी वळसंग जि. प. गटातून तसेच औराद पंचायत समिती गणातूनही उमेदवारी अर्ज भरणार आहेत. एकाच वेळी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या दोन्ही पातळ्यांवर अर्ज भरण्याच्या या खेळीमुळे हसापुरे नेमके कुठे थांबणार, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

हसापुरेंचे कार्यकर्ते सांगतात की कोणत्याही परिस्थितीत ते वळसंग जि. प. गटातून निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर ठाम आहेत. मात्र भाजपकडून त्यांना उमेदवारी न मिळाल्यास हसापुरे काय भूमिका घेणार, स्वबळावर मैदानात उतरणार की अन्य पर्याय स्वीकारणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. एकूणच सुरेश हसापुरेंच्या या दुहेरी अर्जांमुळे दक्षिण तालुक्यात मात्र चर्चांना पेव फुटले आहे. त्यांचा अंतिम निर्णय काय असणार हे येत्या एक-दोन दिवसांत स्पष्ट होणार आहे. मंगळवारी हत्तूर गणातून सुरेश हसापुरे, इंदुमती अलगोंडा पाटील, पंचप्पा धनशेट्टी सोनाली कडते, उज्वला हविनाळे, सविता मेंडगुदले, संदिप टेळे (भाजप), धनशे अचलारे (शिवसेना) यांच्यासह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. बुधवार दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्यासाठी मुदत आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

मी घ्यायला नाही, माझं सोनं किती लाखाचं झालं? हे बघायला आलेय !

कल्याण
670-39-135

मुंबई
889-56-123